# ‘चल हट्! चद्दर का पैसा दो!

**लावणीसम्राज्ञी आसावरी वायकूळ**
संगीत विशारद, इ-९/८ बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०० ०८४.

गेल्या जुलै महिन्यातील गोष्ट. बाबांची पूजा आटोपून ‘मशिदीत प्रगटला परमेश्वर’ ही कादंबरी मी वाचत बसले होते. सहज माझे लक्ष दारात गेले. दाराच्या पहिल्या पायरीवर एक फकीर आमच्या घरातील बाबांच्या मोठ्या फोटोकडे टक लावून पहात होता. मी उठून त्याला पैसे देऊ लागले. फकीर माझ्याकडे पहात म्हणाला, ‘चल हट्. चद्दरका पैसा दो. पूरा पच्चीस रुपिया.’ त्याच्याकडे मी बघतच राहिले. किती तरी फकीर दारात येऊन जातात. पण कोणीही अधिकार वाणीने व जबरदस्तीने काही मागत नाही. मी म्हटले, ‘आता पैसे नाहीत, पुढच्या खेपेस देईन.’ फकीर काही केल्या ऐकेना. तेव्हा माझ्या पतींनी घरात किती पैसे आहेत ते पहाण्यास सांगितले. मी कपाट उघडले आणि पहाते तो, काय आश्चर्य! फकीर मागत होता तेवढेच पंचवीस रुपये कपाटात होते. मागचा पुढचा विचार न करता आम्ही फकीराला पंचवीस रुपये दिले. “नाराज तो नहीं है? मैं फिर नहीं आऊँगा. अल्ला भला करे” असे म्हणून फकीर जो गेला तो आजपर्यंत आम्हाला पुन्हा दिसलाच नाही.

फकीर गेल्यावर त्याच्या ‘चल हट्’ शब्दांची आठवण झाली. अक्कलकोटच्या सपटणेकर वकीलांची ‘चल हट्’ म्हणून बाबांनी संभावना केली होती. दुसऱ्या एका गोष्टीची तीव्रतेने आठवण झाली ती म्हणजे मागच्या खेपेस आम्ही शिरडीत असताना बाबांना शाल घालण्याचे ठरविले होते. पण विस्मरणाने राहून गेले. त्याची फकीराने आठवण तर करुन दिली नसेल ना?

पुढे पाच दिवसांनी दारात आलेला तोच फकीर माझ्या स्वप्नात आला. तो मला दूरवर हात करुन त्या दिशेकडे जाण्यास सांगत होता. एकाएकी फकीर अदृश्य झाला व मंदिराचा सोन्याचा कळस माझ्या डोळ्यासमोर चमकत राहिला, तो इतका की माझे डोळे दिपूनच गेले. मी स्वप्नातून जागी झाले. दुसऱ्या दिवशी शिरडी गाठली. बाबांचे दर्शन घेऊन विनम्रपणे म्हटले, ‘बाबा, फकीराच्या वेषात येऊन तुम्ही मला दर्शन दिलं. मी धन्य झाले!’

रात्री समाधी मंदिरात मी बाबांच्या समोर बाबांची गाणी मनसोक्त गायिली व दुसऱ्या दिवशी पूर्ण समाधानाने घरी परतले तो बाबांच्या कृपेचा सुगंध घेऊनच!

मग जो गाई वाडेकोडे ।
माझे चरित्र माझे पवाडे ।
तयाचिया मी मागे पुढे ।
चोहीकडे उभाचि ॥

श्री साईसच्चरित अध्याय ३ रा.

# श्री साईदर्शन प्रत्यक्ष घडले

**श्री. म. न. सावंत**
उन्मेष, ८२/सी,
जुना प्रभादेवी मार्ग,
वरळी, मुंबई - ४०००२५.

मकर संक्रांतीचा दुसरा दिवस. गुरुवार, ता. १५ जानेवारी १९८७. दुपारी १॥ वाजण्याची वेळ. मी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माझ्या गावी पेंडूर येथे दर दोन वर्षांनी भरणाऱ्या देवीच्या यात्रेकरिता एकटाच गेलो होतो. या देवीच्या यात्रेला "देवीचा मांड" असे संबोधण्यात येते. या दर दोन वर्षांनी भरणाऱ्या देवीच्या मांडाला आमच्या गावातील मुंबईत नोकरी निमित्त वास्तव्य करणारी प्रत्येक घरातील किमान एक तरी व्यक्ती गावी जाते. आमच्या घरातून त्याप्रमाणे मी देवीच्या दर्शनाला गावी गेलो होतो.

आमच्या वाडीतील पदपथावरच आमचे घर वसलेले आहे. साधारण ५/६ फूटावरील पायऱ्या चढून वर जावे लागते. नंतर आमच्या घराचे अंगण व आणखी ३/४ पायऱ्या वर चढून गेल्यावर आमचे वडिलोपार्जित ६० वर्षापूर्वी बांधलेले घर अशी घराची रचना आहे. आमच्या घरातील ओट्यावर मी व गावातील एक दोन व्यक्ती गप्पा मारीत बसलो होतो. त्या वेळी खालून वर पायऱ्या चढत येणारी एक व्यक्ती दिसली. माझ्या बरोबर गप्पा मारीत असलेले एक गृहस्थ मला म्हणाले की, तुमच्या ओळखीचे कोणी तरी गृहस्थ वर येत आहेत, तर आम्ही आता जातो. येणाऱ्या व्यक्तीकडे मी पाहिले व माझ्या मित्रांना मी म्हणालो की, वर येणारी व्यक्ती माझ्या ओळखीची नाही. तो पर्यंत ती व्यक्ती अंगणात येऊन उभी राहिली. काही न बोलता हात वर करुन हाताने आशीर्वाद दिला. तोपर्यंत माझ्याजवळ गप्पा मारीत बसलेले दोघेही जण वरुन प्रथम अंगणात व नंतर खाली उतरुन पायवाटेने निघून गेले. कोणी तरी फकीर असेल या समजुतीने, चार आठ आणे दक्षणा घालावी, या उद्देशाने मी घरात गेलो व सुट्टे पैसे शोधू लागलो. सुट्टे पैसे घरात असून सुध्दा आयत्या वेळी सापडेनात. दर गुरुवारी दुपारी १॥ वाजण्याच्या सुमारास मी मुंबईत श्री साईबाबांना नैवेद्य दाखवितो व तेच जेवण नंतर आम्ही पतीपत्नी प्रसाद म्हणून जेवतो. अशी बऱ्याच वर्षांची प्रथा आहे. त्याक्षणी माझ्या मनाला वाटले की, आज मी इकडे गावी असल्याकारणाने श्री साईबाबांना नैवेद्य दाखवू शकत नाही. तर ती वेळ गाठून श्री साईबाबा तर नाही ना माझ्या भेटीला आले! माझ्या हाताला सुटया पैशाऐवजी एक नोटा सापडली, ती घेऊन बाहेर आलो. ती व्यक्ती श्री साईबाबा आहेत असे मनाला ठाम घेतले. त्यांच्या हातात ती नोट ठेवली व तोंडाने म्हटले की, "श्री साईबाबा ही दक्षणा घ्या". नंतर पाया पडलो. त्या व्यक्तीने नोट घेतली. काही न बोलता पुन्हा एकदा हात वर करुन हाताने आशीर्वाद दिला व आलेल्या मार्गाने पायऱ्या उतरुन ते निघून गेले. संध्याकाळी मी गावामध्ये चौकशी केली, पण त्या व्यक्तीसारखा

दिसणारा फकीर कोणाच्याही घरी न गेल्याने समजले. तेव्हा मी समजलो की, ती व्यक्ती फकीर नसून प्रत्यक्ष श्री साईबाबाच मला आज मी नैवेद्य दाखवितो ती दर गुरुवारची वेळ साधून आले व मला प्रत्यक्ष भेटून गेले.

आता आमच्या गावाकडच्या घरातील श्री साईबाबांच्या खोलीची थोडक्यात माहिती देतो.ह्या खोलीत श्री साईबाबांची स्थापना माझे वडील कै. नागेशराव आत्माराव सावंत यांनी आमचे घर १९२४ साली बांधल्यावर केली. घरावरुन जाणारा प्रत्येक जण वरती पाहून नमस्कार करुनच आपल्या कामास पुढे निघून जातो. श्री साईबाबांचे वास्तव्य या खोलीत आहे, अशी प्रत्येकाची ठाम समजूत आहे.मध्यरात्रीच्या सुमारास ठराविक दिवशी आमच्या गावातील देव व नेहमीच्या पेहेरावातील श्री साईबाबा यांची भेट होताना गावातील कित्येक जणांनी पाहिलेले आहे. आणि या गोष्टीवर माझा दृढ विश्वास आहे. श्री साईबाबा काय चमत्कार घडवितात हे पुढे सांगण्यासाठीच श्री साईबाबांच्या ह्या आमच्या घरातील वास्तव्यासंबंधी वर खुलासा केला.

गुरुवारी दुपारी १॥ वाजता मला प्रत्यक्ष श्री साईबाबांचे दर्शन घडले व त्यांनी नेहमीच्या प्रथेप्रमाणे हात वर करुन दोन वेळा आशीर्वाद दिला. त्याच दिवशी दुपारी मुंबईत पत्नीच्या मोठ्या भावाच्या हृदयविकाराने झालेल्या निधनाची बातमी दूरध्वनीवर तिला समजली. त्यावेळी घरी कोणीही नव्हते. दु:खद बातमी व सहानुभूतीला जवळ कोणीही नाही. हा दु:खद घाव माझी पत्नी सहन करु शकली नाही. शेजाऱ्यांना तिने खिडकीतून हाक मारली व ती बेशुध्द झाली. तिला असलेले कमरेचे दुखणे एकदम वाढले व तिला ते सहन करणे अशक्य झाले. माझा मोठा मुलगा हेमंत परदेशी असतो व दुसरा मुलगा सुहास त्याच्या फॅक्टरीच्या निमित्ताने गोव्याला. मी माझ्या गावी व प्रसंग कठीण आलेला. आमच्या शेजाऱ्यांपैकी कोणीतरी आमच्या मुलीला (सौ. शुभांगी परब), माझी बहीण (सौ. इंदिरा राणे) व नंबर दोनची सून (सौ. वीणा) यांना ही बातमी कळविली. आमच्या सोसायटीमधील वातावरण अतिशय चांगले आहे. सर्व दहा कुटुंबे एका फॅमिलीमध्ये असल्यासारखी राहतात व वागतात. प्रसंग तर गंभीर आलेला. माझ्या पत्नीला हॉस्पिटलमध्ये नेण्याची व्यवस्था ॲम्ब्युलन्स् बोलावून शेजाऱ्यांनी केली. तिला स्ट्रेचरवरुन ॲम्ब्युलन्स मध्ये व ॲम्ब्युलन्स मधून हॉस्पिटल मध्ये नेले. त्यापूर्वी हिंदु कॉलनीमधील डॉ. लाड यांना टेलिफोन करुन त्यांच्या सौजन्याने "शुश्रुषा" या हॉस्पिटल मध्ये एका कॉटची व्यवस्था केली व तेथील औषधोपचार लगेच सुरु झाला. दरम्यान माझी बहिण व भाचा किरण, तसेच जावई श्री. किशोर परब तेथे आले व जवळचे नातेवाईक म्हणून त्यांनी जबाबदारी घेतली. दोन दिवसानंतर शनिवारी सकाळी मी गावाहून मुंबईला आलो. त्यावेळी झालेला सर्व प्रकार मला समजला. तीन आठवडयानंतर माझ्या पत्नीची गेलेली स्मृती पुन्हा आली. त्या दरम्यान काय घडले, तिला भेटावयास कोण कोण येऊन गेले, मी गावाहून कधी आलो, हे तिला काहीच आठवत नव्हते. ता. २८

जानेवारीला माझा वाढदिवसही तिला आठवला नाही. प्रथम "सुश्रुषा" हॉस्पिटल व नंतर मुलाच्या घरी घाटकोपर येथे डॉ. ओरसकर यांच्या ट्रीटमेंट खाली माझी पत्नी होती. नानावटी हॉस्पिटलला नेऊन तिचे सी. टी. स्कॅन करुन घेतले. डॉ. ओरसकर यांच्या हाताला यश आले. महिन्यानंतर माझ्या पत्नीला प्रभादेवीला आमच्या घरी आणले. डॉ. ओरसकर यांची ट्रीटमेंट पुढे ४ महिने चालू होती. वातावरणात बदल व्हावा म्हणून १ मार्चला आम्ही दोघेही मोठ्या मुलाकडे परदेशी गेलो व तेथे ३ महिने राहिलो. दरम्यान माझी पत्नी संपूर्ण बरी झाली व आता पूर्ववत झालेली आहे.

या नंतरच्या सर्व घटना पाहून निश्चित खात्री झाली की, त्या गुरुवारी दुपारी मला भेटण्यासाठी गावी श्री साईबाबाच प्रत्यक्ष भेटून दर्शन देऊन गेले. काही न बोलताच दोन वेळा हात वर करुन हाताने आशीर्वाद दिला. त्यांच्या आशीर्वादाचा मतितार्थ असा की, तुझ्यावर कठीण प्रसंग येणार आहे. पण तू काही काळजी करु नकोस. माझे आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहेत. श्री साईबाबांच्या कृपेमुळेच माझी पत्नी या गंभीर दुखण्यातून बरी झाली. नव्हे तिचा पुनर्जन्मच झाला.

# रोहितची करामत व साईंची कृपा

– सौ. देवकी वासुदेव सकपाळ
टाटा कंपौंड, बि. नं. १, खो. नं. १९,
एस. व्ही. रोड, अंधेरी, मुंबई.

श्री सद्गुरु साईबाबांची लीला अगाध आहे म्हणतात ते काही खोटे नाही. अहो तुम्ही म्हणाल कशी? परंतु आम्हांला बाबांच्या महान लीलेचे असंख्य अनुभव आले आहेत. परंतु आजचा काही निराळाच ताजा अनुभव म्हणजे आमच्या घरात माझ्या मुलाचा मुलगा म्हणजे आमचा नातू चि. रोहितकुमार बाहेरच्या हॉलमध्ये खेळत होता मी घरात आपल्या स्वयंपाक घरात काही काम करण्यात दंग होते व आजोबा श्री. वासुदेव सकपाळ गुरुवार असल्यामुळे बाबांची पुजा पाठ करण्यात दंग व आत्याबाई कुकर -लावण्यात दंग. म्हणजे काय एकंदरीत सकाळची वेळ असल्यामुळे सारी आपापल्या कामात चूर होती. रोहितचे आईवडील कामावर गेली होती. सकाळचा ९। ९॥ चा सुमार होता. या ११ महिन्याच्या मुलाने काय करावे म्हणता? आम्ही म्हणतो त्याला रोजच्या प्रमाणे दूध पाणी दिलं, आता बॉल वगैरे खेळणी घेऊन तो खेळत असेल. अशी आमची समजूत. तर या मुलाने चक्क आमचा सगळ्यांचा डोळा चुकवून टी. व्ही. वरचे कव्हर ओढून घेतले त्याबरोबर टी. व्ही. वरचे घोटेकर गजराचे घड्याळ व टी. व्ही. चा अँटेना जोरात सगळे खाली कोसळले. आम्ही तिघेही धावत बाहेर येऊन पहातो तो आम्ही घाबरल्या स्थितीतच परंतु बाबांच्या कृपेने त्या लहान बाळाला काही सुध्दा धक्का न लागता खुशाल आपला हसतो आहे हे दृश्य बघून आम्हाला इतका आनंद झाला की त्याचे कौतुकच करत बसलो व बाबांच्या सतत नामजपाच्या

सान्निध्यात असलेली माणसे बाबांना लाख लाख प्रणाम करत राहिलो. कारण आपण क्षुल्लक गोष्ट म्हणतो परंतु त्याचं ११ महिन्याच्या मुलाच्या डोक्यावर आज ते घड्याळ पडले असते तर आज केवढा अनर्थ ओढवला असता याची कल्पनाच करवत नाही. आमच्या सर्वांच्या मुखी बाबांचे सतत नामस्मरण असल्यामुळे बाबांनी आमचे संकट दूर केले. अशी आमच्या श्री साईनाथ सद्‌गुरु महाराजांची मोठी कृपादृष्टी आमच्यावर आहे. आज तो नातू ४ वर्षाचा झाला आहे. खेळतो, बागडतो, शाळेत जातो. परंतु या गोष्टीची आठवण झाल्याशिवाय रहावत नाही.

# साईबाबांनी मनोकामना पुरविली

**सौ. वृंदा मनोहर भगवते**
गोविंद नगर ४ अ ७,
बोरीवली (पश्चिम),
मुंबई-४०० ०९२.

८६ च्या नोव्हेंबर मध्ये मी श्री साईंना मनोभावे प्रार्थना केली की कसेही करुन मुलीचे शेवटचे कॉलेजचे वर्ष आहे तरी ती प्रथम श्रेणीत कमीत कमी ६५ टक्के मार्क्स मिळवून पास व्हावी. पण त्यानंतर परीक्षे पर्यंत जे जे प्रकार झाले. ते विचारु नका. आधीच जागा लहान त्यात नेहमी नेहमी पाहुणे! इतके की ऐन परिक्षा चालू असताना सुद्धा ते यायचे राहिले नाहीत. तिला स्वत:लाही बरे नव्हते. तोंड आले होते. जिभेला सर्वत्र फोड आले होते. अभ्यास अजिबात मनासारखा होत नव्हता. डोळे तर अतिशयच दुखायचे. डॉ.चे औषध चालू होते. अभ्यास करवतच नव्हता. एरव्ही ती चांगली धडधाकट असते. ऐन परिक्षेच्या पंधरवड्यात खूपच त्रास झाला. एकेक पेपर देऊन येत होती. तेथेही नशीब आडवे. जो जो भाग तिने केला तो किंवा त्यावरील प्रश्न येत नव्हते. दुसरेच प्रश्न येत होते. मी सुद्धा रडकुंडीला आले. सर्वच पेपर्स असे विचित्र जात होते. फक्त प्रॅक्टिकल्स चांगली गेली. शेवटी साईबाबांना म्हटले, "पास करा. प्रथम वर्ग नसला तरी चालेल. पण तिच्या मानसिक यातना मला बघवत नाहीत." अहोरात्र तोच ध्यास! तिने वर्षभर जो कॉलेजला जाऊन जो काय अभ्यास केला होता त्यावर भर दिला. परिक्षा झाली. पण पास व्हायची खात्रीच नव्हती. परीक्षा झाल्याचा आनंद मनात नव्हता. मी व ती तसे उदासच असायचो. ६ जुलै ८७ ला निकाल लागला. मुलगी कॉलेजात रिझल्ट आणायला जायला तयार नव्हती. शेवटी हे गेले.ते पण दुपारी गेले. ३॥ ला घरी आले. त्यांचा चेहरा आनंदाने ओतप्रोत भरलेला होता. मी म्हटले, "पास झाली ना?" तर हे म्हणतात, "क्लास सांग पाहू?" मी म्हटले, "क्लास जाऊ दे हो! पास ना!" अग फर्स्ट क्लास आहे. मार्क्स ६५ टक्के आहेत. मी रोमांचित झाले. हा साईबाबांचा आशीर्वाद. ही सर्व साईंची अघटित लीला! माझे डोळे भरुन आले. मी त्यांच्या फोटोकडे बघत म्हणत होते, 'अगदी ६।७ महिन्या पूर्वी झालेली माझी मनोकामना तू पूर्ण केलीस. तूच तिच्या मागे पुढे होतास म्हणून हे यश तिच्या पदरात पडले. धन्य तुझी. माझ्या श्रद्धेला असे हे घवघवीत फळ आले. हे साईनाथा तुझ्या चरणी त्रिवार नमस्कार. तुझी कृपादृष्टी अशीच सर्वांवर ठेव.

# आलें साईजींच्या मना–

श्री. आशिष विजय हजारे
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.

हल्ली आमच्या विद्यापिठाच्या परीक्षा म्हणजे एक गौडबंगाल झाले आहे. नेहमीच परीक्षेचा घोळ चालू असतो. कधी त्या वेळेवर होत नाहीत. आमची 'चवथ्या सेमिस्टर' ची परीक्षा यंदा एवढी लांबली की जुलैच्या १७ ला प्रॅक्टीकलच्या शेवटच्या पेपरने संपली. त्यामुळे उन्हाळ्याची सुटी अभ्यासात गेली. इतर कुठे जाऊया पण शिर्डीलाही जाता आले नाही. पण माझ्या भाईप्रमाणे माझीही श्रद्धा आहे की, 'आले साईजींच्या मना तेथे कुणाचे काही चालेना.' अगदी तसेच झाले. परीक्षा संपली आणि पंधरवड्यातच काही कारणामुळे कॉलेजला सुटी होती. बाहेर कुठेतरी जावेसे वाटत होते. मम्मी-भाईला तर सुटी नव्हती. त्यात पिंकूची शाळा! मी सहज माझ्या विनोदमामाकडे गेलो तर त्याने सांगितले, "तुझ्या भाईला सांग शिर्डीला येणार कां, सप्तशृंगीलाही जायचं आहे. खर्च मी करेन." भाईच्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना जमलं नाही. त्यांनी मला पाठविले. आणि अनायासे मला आमच्या आईच्या माहेरची कुलदेवता 'सप्तशृंगी' आणि भाईंचे कुलदैवत (सर्वच देवदेवता ते 'साई'त पाहतात ना!) शिर्डीपती साईबाबा यांचे मनसोक्त दर्शन झाले. पावसाळ्यात ढगातून चालण्याचा (वणीच्या गडावर) अवर्णनीय आनंद मनमुराद मिळाला आणि उन्हाळ्याच्या सुटीतली त्रुटी आपोआप श्रीसाईबाबांनी भरुन काढली. मी मुंबईहून निघालो तो शनिवार होता. त्याच दिवशी भाईंच्या ऑफीस मध्ये 'सत्यनारायणा'ची पूजा होती. त्यांना पूजेला जाऊन 'साईसत्यनारायणा'चे दर्शन घ्यायचे होते. पण तो श्रावणी शनिवार! सकाळी कामे उरकून दुपारी ते घरी आले. मम्मी संध्याकाळी -हाफ डे- ऑफीसमधून परतल्यावर 'उपास' सोडीपर्यंत सहा-सात वाजले होते. त्यानंतर चर्चगेटला जाणे त्यांच्या जीवावर आले. त्यात पिंकूचा हट्ट 'जाऊ नको बाहेर कुठे'..... झाले साईसत्यनारायणाचे दर्शन होणार नाही म्हणून भाई नर्व्हस झाले. रात्री नऊच्या सुमारास कामासाठी खाली उतरले. दौलतनगरला (बोरीवली दहिसरच्या मध्ये) त्यांच्या मावसभावाकडे – अंजूम तांबडे कडे जायला निघाले. जाऊ की नको अशी द्विधा मनस्थिती. शेवटी बाबांचा कौल–म्हणजे डाव्या-उजव्या दिशेपैकी जेथे जाणारी पहिली रीक्षा येईल तेथे जायचे असे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे डाव्या दिशेकडे म्हणजे अंजुमच्या घराकडे जाणारी रीक्षा–त्यात बाबांचा फोटो–आली. साहजिकच, उजव्या बाजुला बेलेकरांकडे राजेंद्रनगर जाणे रद्द करुन ते अंजुमकडे गेले आणि त्याच्या घराचे दार उघडले तोच त्यानी घरातल्या घरात त्या दिवशी घातलेली 'साईसत्यनारायणा'ची पूजा मांडलेली त्यांच्या दृष्टीस पडली. अंजूमच्या आत्या काका-काकूंना सुद्धा भाईनां पाहून आश्चर्य वाटले. श्री साईसत्यनारायणाच्या दर्शनाची आंतरीक इच्छा बाबांनी आपोआप पुरविली होती त्यांची. 'श्री' समोर नतमस्तक होताना भाईंच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वहात होत्या. तो समोरच्या भिंतीवरील फोटोतील बाबा त्यांच्याकडे पहात स्मितहास्य करीत भाईंना आशिर्वाद देत होता त्यांचा साई.... साईभक्त तांबडे कुटुंबियांना ते मनोमन जाणवत होते. पटत होते.

# मी शिर्डीबाबांकडे कसा वळलो

– श्री. परशुराम गोपाळ रायबागकर
मु. पो. कांडगांव, ता. करवीर,
जि. कोल्हापूर.

माझी पत्नी सौ. हौसाबाई हिचा डावा हात खुब्याजवळ दुखत होता. इ.स. १९६५ साली डॉक्टरी उपाय केले. फोटो काढले, देव देवर्षी, जत्रा वगैरे सर्व केले. हाताने साडी नेसणे, केस विंचरणे येत नव्हते. त्यावेळी मी सडोली येथे सेक्रेटरी (सोसायटी) होतो. आमचे मित्र कै. बापू साळोखे हे त्यावेळी शिर्डीस जात होते. त्यांना मी घेऊन कांडगांवी आलो. म्हणालो, माझ्या सौ.च्या हात दुखण्यावर काय इलाज? तो म्हणाला, प्रयत्न करुन बघूया. त्याने रामरक्षा म्हणून, हातास उदी लावली व म्हणाला ८ दिवसात हात दुखायचा थांबला की, लगेच शिर्डीस जावे लागेल. माझे सर्व उपाय करुन मी थकलो होतो. आम्ही म्हणालो, नवव्या दिवशीच जाऊ. काय आश्चर्य! ८ दिवसात संपूर्ण हात दुखायचा थांबला. आम्हाला शिर्डीस कोठे कसे जायचे, ठाऊक नव्हते. नवव्या दिवशी दिपावलीचा पाडवा, त्याचदिवशी साळोखे यांना आमच्या खर्चाने घेऊन शिर्डीस गेलो. तेथे अभिषेक, पूजा करुन २-४ दिवस राहून, परत आलो. त्यापासून अद्याप पर्यन्त तो हात दुखत नाही. सध्या तिचे वय ७५ वर्षांचे आहे. त्यानंतर आम्ही दरवर्षी शिर्डीस जाऊ लागलो. घरातील आमची ४ मुले वरचेवर शिर्डीस जाऊ लागली. श्री साई कृपेने माझे वय ७६ संपत आले तरी मी अजून सेवा सोसायटीत मॅनेजर म्हणून काम करतो. श्री साईकृपेने २ मुलगे इंजिनियर आहेत व १ मुलगा कंट्रोलर व एक व्यवसायिक, नातू-पणतू असा परिवार अतिशय चांगला आहे. ही श्रीबाबांची कृपा. ता. २५-११-८६, मंगळवार, रोजी मी सोसायटीतून घरी जेवण्यास दुपारी १२.३० वा. आलो. घरी सूनबाईने ताट वाढले. आमची पत्नी सौ. हौसाबाई ही त्यावेळी शेजारच्या घरी गेली होती. मी जेवत असताना बाहेरुन आली व काहीतरी करत होती. मी जेवण करुन ऑफिसमध्ये पेपर वाचत बसलो होतो. अर्ध्या तासाने आमचा नातू प्रशांत तेथे बोलावण्यास आला. तो म्हणाला, आजोबा घरी या, थोरल्या आईचे पोटात फार दुखत आहे. घरी सर्व माणसे जमली आहेत. डॉ.ला घेऊन या म्हणाले म्हणून सांगत आलो. त्यालाच डॉक्टरकडे पाठविले, पण डॉक्टर घरी नव्हता म्हणून तो परत आला. वाटेत पुन्हा माझा थोरला नातू काशिनाथ भेटला व म्हणाला, कोणाची तरी जीप, टॅक्सी बघा. कोल्हापूरी न्यावे लागणार. जास्त झाले आहे. मी घरी गेलो. जमलेली इतर माणसे आपआपल्या घरी गेली होती. थोरली सून सौ. सुलोचना तिचा रेच (घरगुती पद्धत) काढत होती. मी जावून तिच्या अंथरुणाजवळ बसलो बाबांची मूर्ती व छबीची आठवण करुन म्हटले, बाबा, अनेक भक्तांच्या संकटास धावून जाता, मला यावेळी अनुभव द्यावा, असे म्हणून शिर्डीहून आणलेली उदी तिच्या तोंडात घातली व कपाळास लावली. तेथे ५-७ मिनिटे बसलो. ७-८ मिनिटांतच तिला झोप लागली. त्यापासून पोटात दुखायचे बंद झाले. केवढा हा उदीचा प्रताप!

तिसरा अनुभव माझ्या नातवाचे लग्न होऊन १ वर्ष झाले पण त्याचे व त्याच्या पत्नीमध्ये किरकोळ वाद होऊन तिला माहेरी ठेवण्यात आले होते. कोणीच काही तडजोड करीत नव्हते. बाबांना साकडे घातल्यावर सर्व दोष दूर होऊन आता पती-पत्नी पुणे येथे बजाज कंपनीमध्ये नोकरी करुन आनंदात आहेत. ही बाबांचीच कृपा.

सर्वांनी श्री बाबांवर श्रद्धायुक्त अंतःकरणाने, मनोभावे फलाची आशा न धरता भक्ती करावी. मग ते आपल्या मनाने केव्हा काय करतील ते पहात रहावे. विशेष श्रद्धा आणि सबूरी ही महत्त्वाची आहे.

# नागिणीचा वेढा पार गेला

**श्री. शाम विठोबा जाकळकर**
७५३ गुरुवार पेठ,
गोरावडे वाडा, पुणे-२.

गेल्या १६ जूनला माझ्या भावाचे लग्न होते. त्यासाठी मी व माझे सर्व कुटुंब १५ दिवसांची रजा काढून गावी गेलो होतो. ठरल्याप्रमाणे लग्न अत्यंत चांगल्या प्रकारे पार पडले व त्यानंतर होणाऱ्या सत्यनारायणाची पूजा व गोंधळ यासाठी आम्ही गावीच होतो. एक दिवस अचानक सकाळी उठल्यानंतर मला माझ्या कंबरेभोवती लाल चट्टा दिसू लागला व तो जस जसा वेळ जाऊ लागला, तस तसा माझ्या कंबरेला वेढा मारल्या सारखा पसरु लागला. मी सहज माझ्या थोरल्या बहिणीला दाखवला तर ती घाबरली व ताबडतोब गावातील चार-पाच म्हाताऱ्या माणसांकडे मला घेऊन गेली. सर्वांचे मत असे पडले की नागिणीचा वेढा पडला आहे व ज्या वेळी पट्टा वाढत जाऊन एकमेकांना पूर्ण मिळून वेढा पूर्ण होईल त्यावेळी माणूस दगावण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्वजण घाबरले व लग्नात काही विघ्न येऊ नये म्हणून आपापल्या परीने उपाय सुचवू लागले. मी सुद्धा पार घाबरुन गेलो. अचानक मला माझ्या जवळील उदीची आठवण झाली. जी गेली तीन वर्षे कायम माझ्या खिशात असते. उदीची पुडी खिशात असल्याशिवाय मी कधीच घराबाहेर पडत नाही. बाबांच्यावर पूर्ण भरवसा टाकून खिशातील उदी काढून थोडी ओली करुन त्या लाल चट्ट्याला सर्व बाजूंनी चोळली. तर काय आश्चर्य! संध्याकाळ पर्यंत सर्व चट्टा जाऊन कंबर पाठ मोकळी झाली. मी माझ्या बहिणीला व सर्वांना सांगताच सर्वांना आनंद झाला व मी मनोमन बाबांना नमस्कार केला व म्हटले, 'बाबा, तुमची जो पर्यंत कृपा छाया आमच्या कुटुंबावर आहे तो पर्यंत कोणतेच संकट आमच्या पर्यंत पोहोचणे शक्य नाही. तरी आपण आमच्या प्रमाणेच तुमच्या भक्तांवर अशीच कृपादृष्टी ठेवावी ही हात जोडून नम्र विनंती.

# "आपला बाप तो आपला बाप"

**श्री. अनिल केशवराव रसाळ**
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व), मुंबई-४०० ०३७.

माझे स्नेही व श्रींना गुरु मानणारे सद्‌भक्त एके दिवशी कार्यालयात आले. ते अतिशय उत्साहाने मला म्हणाले की, "फार मोठे संत ताजमहाल इंटर कॉन्टिनेंटलमध्ये उतरले आहेत. माझे नातेवाईक व मी त्यांच्या दर्शनाला उद्या जाणार आहोत. तुम्ही पण चला." मी त्यांच्या उत्साह पाहून काही वेळ स्तब्ध राहिलो. त्यांनी पुन्हा मला दर्शनाला चलण्याचा आग्रह केला. तेव्हा मी त्यांना, "बाबांना विचारुन उद्या सांगतो" असे म्हणालो.

दुसरे दिवशी मी त्यांना श्रींनी मला दर्शनाला जाऊ नये, असे सांगितल्याचे सांगितले. ते थोडे निरुत्साही झाले व म्हणाले, "दर्शनाला जायला कशाला श्रींची परवानगी? आपण या गोष्टी श्रींच्या ईच्छेने घडतात असे समजून दर्शन घ्यावे. व अशा संतांचा अलभ्य सहवाज घ्यावा." मी गप्प बसलो.

थोड्याच दिवसांत "टाईम्स ऑफ इंडया" या वर्तमानपत्रात ज्या तथाकथित संतांचे दर्शन माझ्या स्नेह्याने घेतले, त्यांना एका स्त्रीच्या दागिन्यांचा अपहार केल्याच्या आरोपावरुन अटक झाल्याची बातमी आली. ती मी माझ्या स्नेह्यांना सांगितली. आता गप्प बसण्याची वेळ त्यांची होती. ते व त्यांच्यासारखे अनेक भक्त अशा दर्शनासाठी उत्सुक असतात व फसतात. निरर्थक वेळ व पैसा मात्र वाया जातो. काही प्रसंगी अशा घटना भक्तांची श्रद्धासुद्धा अस्थिर करतात.

या संदर्भात मला श्रीसाईसच्चरित्रातील २६व्या अध्यायांतील भक्त पंतांची कथा आठवली. ती आपल्यासारख्या श्रींच्या असंख्य सामान्य भक्तांना मार्गदर्शक आहे.

श्री. पंत हे श्रींच्या दर्शनासाठी उत्सुक नसतात. त्यांचे इतर स्नेही त्यांना फार आग्रह करतात, तेव्हा आपल्या गुरुंची रीतसर परवानगी काढून त्यांच्या दर्शनाला जातात व तिथे चक्कर येऊन बेशुद्ध पडतात. थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर बाबा त्यांना म्हणतात की, "कोणत्याही परिस्थितीत आपल्या गुरुवरील श्रद्धा ढळू देऊ नये. "आपला बाप तो आपला बाप". त्याच अध्यायात पुढे श्री. पितळे या भक्ताला त्यांच्या घरी असलेली परंपरागत अक्कलकोट स्वामींची भक्ती पुन्हा सुरु करण्यास सांगतात. या सर्व गोष्टींचे सार एकच की, "आपला बाप तो आपला बाप."

याचे कारण असे की, जन्मोजन्मींच्या पूर्वसुकृतांनी भक्ताला श्रीसद्‌गुरु भेटतात व त्यांचा अनुग्रह मिळतो. त्यांच्या साधनेला गुरुकृपेने गति मिळते व त्याची प्रगति निर्धोक होते. त्यामुळे एकदा गुरुने अनुग्रह दिल्यानंतर त्याच्या आज्ञेत रहाणं हे सर्व दृष्टींनी श्रेयस्कर. कारण त्यांनी आपल्याला मोक्षापर्यंत नेण्याची पूर्णतया जबाबदारी घेतलेली असते. व अनुग्रह देण्यापूर्वी आपली पात्रता पूर्णपणे जोखलेली असते. त्याशिवाय अनुग्रह दिला जात नाही. अनुग्रहानंतर शिष्याच्या प्रत्येक गोष्टीवर

सद्‌गुरुंचे पूर्ण लक्ष असते. त्याचा पूर्ण विकास व्हावा, यासाठी सद्‌गुरु तशी परिस्थिती निर्माण करतात व ती टिकावी असा त्यांचा प्रयत्न सतत असतो. शिष्यानेही सद्‌गुरुंचा अनुग्रह हा त्याने त्या व्यक्तिची वेगवेगळ्या कसोट्या लावून मगच घेतलेला असतो. तेव्हा सद्‌गुरुंनी सांगितल्या शिवाय काहीही न करणे, हे त्याचे सर्व बाबातीत कर्तव्य ठरते. यात त्याचे हित असते कारण बापाला जितके आपल्या मुलाचे हित कळते, तितके इतरांना नाही. त्याचे स्वतःच्या मुलाचे निरीक्षण इतरांपेक्षा जास्त बारीक असते व निसर्गनियमानुसार त्याचे प्रेमही तितकेच उत्कट व कळकळ निरपेक्ष असते. तेव्हा आपला बाप सोडून इतरांच्या आग्रहापोटी केवळ आग्रह करणाऱ्या व्यक्तीची मर्जी राखण्यासाठी दुसऱ्यांच्या सद्‌गुरुचे दर्शन परवानगीशिवाय घेऊं नये. त्यामुळे गुरुआज्ञाभंगाचे पातक लागते. शिवाय माझ्या स्नेह्यासारखी फसगत होते. तेव्हा "आपला बाप तो आपला बाप" हे श्रींचे ब्रीदवाक्य त्यांच्या भक्तांनी आपल्या हृदयावर कायमचे कोरुन ठेवावे व त्यांना विचारल्याशिवाय कोणाचेही दर्शन घेऊ नये. कारण बाबांचे ब्रीद वाक्य आहे "तान्ह्या निकें ते माऊलीसीचि करणें॥' व अशी प्रत्येक गोष्ट ते आपणहून करतात.

# आईला मृत्यूच्या मुखातून वाचविले

— श्री. शशिकान्त विनायक तारे
१४६४/१११/५६, शिवाजी नगर,
भोपाल, (मध्य प्रदेश) - ४६२ ००६.

जवळ जवळ दहा-बारा वर्षापूर्वीची गोष्ट आहे. माझ्या आईची तब्येत अचानक रात्री एक ते दोन वाजायच्या आसपास बिघडली. आम्ही घरातील सर्वजण एकदम घाबरुन गेलो. डॉक्टरला बोलावून आणले. डॉक्टर आल्यावर त्यानी सांगितले की, आई फक्त थोड्या वेळाची साथी आहे. जितक्या नातेवाईकांना बोलवायचे असेल, बोलावून घेणे. माझ्या वडिलांची श्री साईबाबांवर फारच श्रद्धा होती. त्यांना आम्ही नाना म्हणत असू. आता ते आमच्या मध्ये नाहीत. (स्वर्गवासी झाले आहेत.) त्यांनी ताबडतोब बाबांचा धावा सुरु केला. आईला बाबांचा अंगारा व बाबांच्या नावाने पाणी मंत्रवून दिले. डॉक्टर तेथेच बसले होते. त्यांनी असे म्हटले की, आता काहीच उपयोग नाही. परन्तु जवळ-जवळ दहा मिनिटांनी आईने डोळ उघडून पाहिले व बाबांच्या फोटोला हात जोडला. डॉक्टरांस आश्चर्य वाटले. असे या साईमाऊलीचे आमच्या परिवारावर अनंत उपकार आहेत.

आमच्या घरात प्रत्येक खोलीत श्री साईबाबांचा फोटो आहे. रात्री झोपताना, बाहेर जाताना घरातील सर्व सदस्य श्री साईबाबांची उदी नेमाने लावतात. श्री साईबाबा आम्हाला आमच्या घरातील एक सदस्याप्रमाणे वाटतात कारण असे की, जर घरात काही कमी जास्त झाल्यास त्यांना अगदी आपलेपणाने त्या गोष्टीबद्दल सांगितले जाते.

खरोखर साई चरित्रातील या वचनाची आठवण येते, "जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी."

# दोन उपयुक्त पुस्तके

**१. सुबोध भगवद्गीतासार**— मराठीतील अनेक धार्मिक पुस्तकांचे लेखक श्री. दिवाकर घैसास यांनी संपूर्ण भगवद्गीतेचे मराठी गद्य भाषांतर अत्यंत सुबोध भाषेत सादर केले आहे. संपूर्ण गीता हे एकजिनसी व्यवहारोपयोगी तत्त्वज्ञान आहे, हे त्यांनी ठिकठिकाणी मागचे पुढचे श्लोकांचा संदर्भ देऊन स्पष्ट केले आहे, तसेच काही संस्कृत शब्दांचा समर्पक अर्थ करुन शंकानिरसन केले आहे. गीतेच्या श्लोकांचे क्रमांक कंसात दिले आहेत. मुखपृष्ठावर श्रीकृष्णार्जुनांचे सुंदर चित्र आहे. शेवटी पाठांतरासाठी अठरा श्लोकी मराठी गीता दिली असून गीतेसबंधी महत्त्वाची प्रश्नोत्तरेही दिली आहेत. सामान्य वाचकाला हे पुस्तक गीतेचा उत्तम परिचय करुन देईल व आध्यात्मिक वाचनाची गोडी लावील यात संशय नाही. आपली उन्नती आपणच करावयाची असते, हा संदेश देणाऱ्या गीतेची शिकवण समाजाला व व्यक्तीला अमृतासमान आहे. पण ती आचरणात मात्र आणली पाहिजे. या साररुपी गीताग्रंथाचे जो मनन व चिंतनपूर्वक वाचन करील त्यांचे जीवन धन्य होईल यात संशय नाही.

**२. सुविचार-दर्शन**— दिवाकर-माधव यांनी संकलित केलेले हे पुस्तक सद्य:स्थितीतच नव्हे तर कोणत्याही काळात समाजाला फारच उपयुक्त आहे. प्राचीन व अर्वाचीन अशा अनेक विचारवंतांनी सांगितलेला व्यवहारबोध या पुस्तकात छोटया, छोटया मार्मिक वचनांच्या रुपात ग्रथित केला आहे. या प्रकारचे उपयोगी पुस्तक मराठीत जवळजवळ नाहीच, असे म्हणता येईल. सुखदु:खाचा विचार, कौटुंबिक व सामाजिक संबंधाबद्दलचा नीतिविचार, धनाबद्दलचा विचार इत्यादी सर्व थरातील लोकांच्या दृष्टीने उपयुक्त सापडेल. विचार आणि सुंदर तत्त्वविचार यांचा अमोल ठेवा वाचकाला या पुस्तकाला सापडेल. विचारधन हे प्रत्यक्ष जीवनानुभवातील नवनीत असते, उच्च आदर्श नसतील तर समाज नाश पावतो. सध्याच्या परिस्थितीत तर हे पुस्तक नित्य वाचन, मननासाठी प्रत्येकाने जवळ ठेवावे असे आहे.

**वरील दोन्ही पुस्तकांचे प्रकाशक: माधव त्रिंबक परचुरे, बलवंत पुस्तक भांडार गिरगांव नाका, मुंबई-४०० ००४.**

**१.सुबोध भगवद्गीतासार**—रचना—दिवाकर अनंत घैसास. पृष्ठे१३६, मूल्य १५ रुपये)

**सुविचार-दर्शन**—(संकलन— दिवाकर—माधव, पृष्ठे १०४, मूल्य १२ रुपये)

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | -,,- | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | -,,- | हिंदी | - | - |
| ४. | -,,- | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | -,,- | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | -,,- | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | -,,- | तामीळ | - | - |
| ८. | -,,- | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | - | - |
| ११. | -,,- | हिंदी | - | - |
| १२. | -,,- | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | - | - |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | -,,- | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | -,,- | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | -,,- | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | -,,- | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २० | | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१ | -,,- | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | - | - |
| २५. | -,,- | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | -,,- | हिंदी | - | - |
| २७. | -,,- | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | -,,- | तेलगु | - | - |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | - | - |
| ३१. | -,,- | इंग्रजी | - | - |
| ३२. | -,,- | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |